जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ७४२ दिनांक - ११/१०/२०२३**

चंदननगर पोलीस स्टेशन,पुणे शहर

## येरवडा पोलीस ठाणे कडील तडीपार आरोपीस पिस्टलसह केले जेरबंद

दि.१०/१०/२०२३ रोजी चंदननगर पो.स्टे कडील तपास पथकातील अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रशांत माने व पोलीस अंमलदार पोलीस स्टेशन हद्दीत कर्तव्यावर असताना **पोलीस अंमलदार श्रीकांत कोद्रे, सुरज जाधव** यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, येरवडा पोलीस स्टेशन रेकॉर्डवर असलेला व तडीपार आरोपी नामे रोहित राजु धाडवे रा लक्ष्मी नगर गेनबा शाळे समोर, येरवडा पुणे हा चंदननगर पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये रिव्हर डेल सोसायटी नदीपात्रा मध्ये कडेचा सिमेंट रोड येथे त्याचे जवळ पिस्टल जवळ बाळगुन वावरत आहे अशी बातमी मिळाली.

सदर बातमी बाबत वरिष्ठांना कळविल्यावर वरिष्ठाचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी रिव्हर डेल सोसायटी नदीकडेचा सिमेंटचे रोडचे बाजुला झाडाखाली उभा असलेला दिसला तेव्हा पोलीस त्याचे दिशेने येत असल्याचे पाहुन पळुन जावु लागला तेव्हा पोलीस स्टाफनी मिळुन त्यास शिताफीने पकडुन त्याचे नाव विचारले असता त्याचे नाव **रोहित राजु धाडवे वय २२ वर्षे सध्या रा संघर्ष चौक चंदननगर पुणे** असे असल्याचे सांगितले. अंगझडती मध्ये त्याचे कंबरेला मागील बाजुस पॅन्टचे आतमध्ये खोचुन ठेवलेले एक लोखंडी अग्निशस्त्र मिळुन आले आहे. तसेच सदरचा आरोपी हा मा पोलीस उप-आयुक्त परि-०४ यांचे तडीपार आदेश क्र २७/२०२३ अन्वये दिनांक ०७/०७/२०२३ रोजी पासुन पुणे शहर व पिंपरी चिंचवड व पुणे जिल्हयांतुन २ वर्षाकरिता तडीपार असतानाही आदेशाचे भंग केल्याने त्याचे विरुद्ध **पोलीस अंमलदार सुरज जाधव** यांनी **चंदननगर पो.स्टे गु.र.न ४७२/२०२३ आर्म ॲक्ट कलम ३/२५ महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३),१३५ व १४२ अन्वये गुन्हा नोंद केला असुन त्यास अटक केली आहे. त्यांचेवर येरवडा पोलीस स्टेशनला १) गुरनं ७०/२०२२ भादंवि ३०७ आर्म ॲक्ट ४(२५), २) गुरनं ५५३/२०२१ भादंवि ३९४ चंदननगर पोलीस स्टेशनला ३) १५/२०२२ भादंवि ३८४ इतर कलमान्वये गुन्हे नोंद** आहेत.

सदरची कामगिरी ही मा. अपर पोलीस आयुक्त पुर्व विभाग पुणे शहर, श्री.रंजनकुमार शर्मा मा. पोलीस उपआयुक्त परीमंडळ ४ पुणे श्री.शशिकांत बोराटे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त येरवडा विभाग पुणे शहर श्री.संजय पाटील,यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक चंदननगर पो.स्टे.पुणे शहर, श्री.राजेंद्र लांडगे, पोलीस निरीक्षक (गुन्हे)श्रीमती मनिषा पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक प्रशांत माने,पोलीस अंमलदार गणेश हाडंगर,शिवाजी धांडे,श्रीकांत शेंडे,सचिन रणदिवे,अविनाश संकपाळ, सुभाष आव्हाड, महेश नाणेकर,सुहास निगडे, श्रीकांत कोद्रे,सुरज जाधव शेखर शिंदे, यांनी केली आहे.


महाराष्ट्र पोलीस
चंदननगर पोलीस स्टेशन
चंदननगर, खराडी, पुणे शहर १४.
फोन नं - ०२० २७०१२३२१
पोलीस आयुक्तालय पुणे शहर.
चंदननगर पोलीस स्टेशन